सिद्धी प्रकाशन
श्रीनगर, नांदेड.

येथे सर्व प्रकारची पुस्तके, नियतकालिके व मासिके प्रकाशित केली जातील.
पुस्तकांसाठी ISBN नंबर उपलब्ध.

संपर्क : डॉ. राजेश गंगाधरराव उंबरकर, सौ.पल्लवी लक्ष्मण शेटे मो. 9623979067



G Pay PhonePe BHIM 9623979067

Worldwide International Inter Disciplinary Research Journal
Website : www.wiidrj.com
C/o. R.G. Umbarkar, H.No. 624, Bela Nagar, Near Maruti Mandir, Taroda Kh. Nanded - 431 605 Maharashtra (India)
Email : umbarkar.rajesh@yahoo.com
shrishprakashan2009@gmail.com
Mob : +91-9623979067

Worldwide International Inter Disciplinary Research Journal (A Peer Reviewed) Year - 7, Vol. II, Issue LII, 29 March 2022

MAH/NAN/10936/2015
ISSN : 2454-7905
SJIF 2021 - Impact Factor : 7.479

Worldwide International Inter Disciplinary Research Journal
(A Peer Reviewed)

Year - 7, Vol. II, Issue- LII, 29 March 2022



- Editor -
Mrs. Pallavi Laxman Shete

Address for Correspondence
Mrs. Pallavi Laxman Shete
Editor in Chief : Worldwide International Inter Disciplinary Research Journal (A Peer Reviewed Reffered)
Principal, Sanskriti Public School, Nanded (MH. India) Email : shrishprakashan2009@gmail.com
Dr. Rajesh G. Umbarkar
House No. 624 - Belanagar, Near Maruti Temple, Taroda (Kh.) Nanded - 431605 (India - Maharashtra)
Email - umbarkar.rajesh@yahoo.com, shrishprakashan2009@gmail.com Mob. No. 9623979067
Director : Mr. Tejas Rampurkar (For International Contacts only + 91-8857894082)

(Arts - Humanities - Social Sciences - Sports, Commerce, Science, Education, Agriculture, Management, Law, Engineering, Medical, Ayurveda, Pharmaceutical, Journalism, Mass Communication, Library Science Faculty's)

दारिद्र्य आणि बेरोजगारी देशाच्या आर्थिक विकासातील एक अडथळा

प्रा. पारधी प्रवीण सोमा

अर्थशास्त्र विभाग, बी. डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव, ता.आंबेगाव जि.पुणे.

गोषवारा:

दारिद्र्य आणि बेरोजगारी या आजच्या भारतापुढील महत्त्वाच्या आव्हानात्मक समस्या आहेत. या दोन्ही समस्यांचे स्वरूप अस्पष्टच आहे. अर्थव्यवस्था बेरोजगारांना का सामावून घेऊ शकत नाही याबाबत आश्चर्यभाव निर्माण होतो. गेल्या काही दशकांमध्ये भारताची अर्थव्यवस्था 6 व्या क्रमांकाची आणि जलद गतीने विकास करणारी अर्थव्यवस्था आहे. परंतु अर्थव्यवस्थेचा आर्थिक वृद्धीदर 9 टक्के असून देखील दारिद्र्य आणि बेरोजगारी या समस्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. या दोन्ही समस्यांचा अभ्यास वर्णनात्मक आणि संख्यात्मक पद्धतीने केलेला आहे. भारतामध्ये औपचारिक क्षेत्रापेक्षा अनौपचारिक क्षेत्रामध्ये रोजगाराच्या संधीचे प्रमाण जास्त दिसून येते. अनौपचारिक क्षेत्रामध्ये रोजगाराच्या संधीचे प्रमाण वाढत आहे परंतु या क्षेत्रामध्ये अल्प उत्पन्न मिळते. लोकसंख्या वाढ, उत्पन्नाचे असमान वितरण, यामुळे दारिद्र्य आणि बेरोजगारी या सामाजिक समस्या दिवसेंदिवस अधिक तीव्र होत आहेत. या समस्या देशाच्या विकासाला कारणीभूत ठरलेल्या आणि सामाजिक व आर्थिक घटकांचा विचार करून भारताच्या अर्थव्यवस्थेतील बदलांचा चिकित्सक अभ्यास करण्याचा प्रयत्न या शोधनिबंधात केला जाणार आहे

मुख्य घटक:

दारिद्र्यामुळे बेरोजगारी आणि बेरोजगारी मुळे दारिद्र्य निर्माण होते.

उद्दिष्टे:

- दारिद्र्य आणि बेरोजगारी या सामाजिक समस्यांचा अभ्यास करणे.
- दारिद्र्य आणि बेरोजगारी यांच्या कारणांवर आणि प्रकारांवर प्रकाश टाकणे.
- दारिद्र्य आणि बेरोजगारी या सामाजिक समस्या कमी करण्यासाठी उपाय योजना सुचविणे.
- दारिद्र्य आणि बेरोजगारी या सामाजिक समस्यापासून लोकांना जागृत करणे आणि चालू परिस्थितीची माहिती घेणे.

संशोधन पद्धती:

या शोधनिबंधाचे लेखन करण्यासाठी वर्णनात्मक व संख्यात्मक पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे. तसेच माहिती संकलनासाठी द्वितीय स्रोताचा वापर करून माहितीचे संकलन केलेले आहे.

प्रस्तावना:

भारत हा गरीब लोकांचा श्रीमंत देश आहे. देशाची अर्थव्यवस्था विकसनशील स्वरूपाची आहे. दारिद्र्य आणि बेरोजगारीचा प्रश्न आपल्या देशाचा अर्थकारणाचा, समाजकारणाचा, नैतिकतेचा आणि राजकारणाचा महत्त्वाचा व अग्रक्रमाचा बनलेला आहे. भारतातील बेरोजगारी आणि दारिद्र्य ही समस्या आपल्या देशाच्या,, राज्याच्या, शहरांच्या, गावांच्या एवढेच नव्हे तर प्रत्येक कुटुंबातील चिंतेचा बनलेला आहे. या दोन्ही समस्यांचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर आणि विकासावर होताना पाहायला मिळतो. 21 व्या शतकामध्ये या दोनही सामाजिक समस्या अर्थव्यवस्थेला घातक ठरत आहेत. वर्ष 2012 ते 2013 मध्ये दारिद्र्याचा

दर 21.9 टक्के होता. तर वर्ष 2020 ते 2021 मध्ये दारिद्र्याचा दर 27.9 टक्के इतका वाढलेला आहे. त्याचप्रमाणे बेरोजगारीचा जर विचार केला तर वर्ष 2019 मध्ये 6.86 टक्के इतका होता तर वर्ष 2022 मध्ये 8.10 टक्के इतका वाढलेला आहे. म्हणजेच दारिद्र्य आणि बेरोजगारी या समस्यामध्ये दिवसेंदिवस वाढत आहे. देशाच्या आर्थिक विकासासाठी आर्थिक नियोजन देखील केले जाते. परंतु या प्रयत्नांमुळे देखील दारिद्र्य आणि बेरोजगारी या मूलभूत सामाजिक समस्या म्हणाव्या तितक्या प्रमाणात गुणात्मकतेने आणि समाधानकारकपणे अजूनही सुटलेल्या नाहीत. लोकसंख्यावाढ, व्यापार चक्रातील चढउतार, आर्थिक धोरणातील धरसोडपणा, अकुशल कामगार, साधनसंपत्तीचे असमान वितरण, निरक्षरता, औपचारिक क्षेत्रातील कमी झालेल्या रोजगाराच्या संधी, प्रश्न सोडविण्यासाठी आवश्यक असलेल्या राजकीय इच्छाशक्तीचा अभाव, विकास कार्यक्रमांच्या कार्यवाहीची अंमलबजावणी व्यवस्थित न करणे या सामाजिक समस्या सुटण्याऐवजी अधिकाधिक गुंतागुंतीच्या व तीव्र समस्या बनत चाललेल्या आहेत.

दारिद्र्य:

विविध अर्थतज्ज्ञांनी त्याचप्रमाणे विविध समित्यांनी दारिद्र्याची संकल्पना वेगवेगळया केलेल्या आहेत. दारिद्र्याची व्याख्या ही तत्कालीन परिस्थिती,, परिमाणे,, देशाचा विकास,, उष्मांक,, उपभोग खर्च यावर आधारित किंवा अर्थव्यवस्थेनुसार वेगवेगळया असू शकतात म्हणून भारतातील दारिद्र्य आणि दारिद्र्य विषयक समित्या यांमध्ये भिन्नता आढळून येते.

व्याख्या:

दारिद्र्य म्हणजे "मानवी जीवन जगण्यासाठी आवश्यक असणाऱ्या मूलभूत गरजा न भागविता येण्याची परिस्थिती होय".

दारिद्र्य म्हणजे "भौतिक व अभौतिक परिमाणांपासून वंचित राहणे".

दारिद्र्य या संकल्पनेचा विचार केला तर, स्वातंत्र्यपूर्व काळात दादाभाई नौरोजी यांच्या 'दारिद्र्य आणि ब्रिटीशकालीन नियम' या पुस्तकात या संबंधी माहिती दिलेली आहे. अर्थशास्त्रामध्ये दारिद्र्य संकल्पना संदिग्ध स्वरूपाची आहे. राष्ट्रीय उत्पन्न, परिमाणे, उपभोग खर्च हे दारिद्र्याचे निर्देशांक असल्यामुळे वेगवेगळया देशामध्ये दारिद्र्याची पातळी वेगवेगळी असते.

दारिद्र्य हे आजच्या भारतापुढील महत्वाचे आव्हान असून आर्थिक व सामाजिक घटकांशी संबंधित आहे. भारतातील दारिद्र्याला प्रदीर्घ इतिहास आहे. ब्रिटिश काळामध्ये हस्त व कुटिरउद्योगांचा ऱ्हास, साधन संपत्तीचे असमान वितरण, सामग्रीचे आर्थिक नि:सारण, दडपशाहीचे आर्थिक धोरण, सतत पडणारे दुष्काळ तसेच लोकसंख्या वाढ आणि बेरोजगारी, दारिद्र्याचे दुष्टचक्र या कारणांमुळे भारतीय लोकसंख्येचा मोठा भाग दारिद्र्यात जीवन जगत होता. आणि अजून देखील जीवन जगत आहे.

दारिद्र्याचे प्रकार:


निरपेक्ष दारिद्र्य:

निरपेक्ष दारिद्र्य किमान उपभोगाच्या गरजांनुसार मोजले जाते किंवा मोजण्यासाठी काही मानके किंवा प्रमाण असते. म्हणजेच अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि आरोग्य या मानवाच्या मूलभूत गरजा आहेत. त्यांची किमान वास्तव परिमाणे असतात. या परीमाणांचे रूपांतर पैशात केले जाते. आणि दरडोई आकडा चढविला जातो. आवश्यक उपभोग माणसाला कमी असेल तर ते लोक दारिद्र्य रेषेखालील जीवन जगत आहे असे समजले जाते.

सापेक्ष दारिद्र्य:

या दारिद्र्याचा अभ्यास उत्पन्न पातळी, संपत्ती, पायाभूत सुविधा, उपभोग खर्च, आर्थिक निष्क्रियता, राहणीमान यांच्या परस्पर तुलनेमधून केला जातो. सापेक्ष दारिद्र्य सर्वच देशात आढळून येते. आणि या दारिद्र्याचे पूर्णपणे निर्मूलन करता येत नाही. सापेक्ष दारिद्र्यामध्ये दारिद्र्य रेषेखालील व दारिद्र्य रेषेवरील लोकांची राहणीमानासबंधित तुलना केली जाते त्याला सापेक्ष दारिद्र्य म्हणतात.

दारिद्र्य दर:



Source – Economic survey 2013 – 14Planning commission, NSO, MPI

वर्ष 2004 ते 2005 मध्ये दारिद्र्याचा दर 37.2 टक्के इतका आहे. म्हणजेच इतर वर्षाच्या तुलनेत अधिक आहे. वर्ष 2011 ते 2012 मध्ये हा दर 21.9 टक्के इतका कमी झाला आहे. दारिद्र्य निर्मूलन करण्यासाठी सरकारच्या विविध योजना आणि अनौपचारिक क्षेत्रामधील रोजगाराच्या संधी अशा कारणांमुळे हा दर कमी झाला आहे परंतु वर्ष 2020 ते 2021 मध्ये दारिद्र्याचा दर 27.9 टक्के पर्यंत वाढलेला दिसून येतो. दरम्यानच्या काळामध्ये करोना संकट उद्भवल्यामुळे देशामध्ये लॉकडाउन करण्यात आले होते. एकूणच मागणी कमी झाल्यामुळे याचा परिणाम अर्थव्यवस्थेमधील प्राथमिक क्षेत्र, द्वितीय क्षेत्र, आणि तृतीय क्षेत्रावर झाला होता. त्याच प्रमाणे बेरोजगारी, व्यापरचक्रातील मंदी सदृश्य परिस्थिती व उत्पन्नाचे असमान वितरण तसेच अनौपचारिक क्षेत्रामध्ये रोजगार संधी उपलब्ध होत असल्या तरी उत्पन्न कमी असल्यामुळे मूलभूत गरजा पूर्ण करण्यास अडचणी येतात.यामुळे दारिद्र्याचा दर वाढत आहे.

दारिद्र्याची कारणे:

दारिद्र्य ही भारताच्या विकासातील एक अत्यंत महत्वाची समस्या आहे. दारिद्र्याचे दुष्टचक्र, लोकसंख्यावाढ, पायाभूत सुविधांचा अभाव, दरडोई उत्पन्न कमी, आर्थिक विषमता, बेरोजगारी, शेती क्षेत्रातील अपयश, जमिनीचा अभाव इ. या सारख्या कारणांमुळे दारिद्र्य निर्माण होते.

बेरोजगारी:

बेरोजगारी ही आजच्या भारतापुढील अत्यंत महत्वाची आणि ज्वलंत समस्या आहे. भारत म्हणजे सर्वाधिक बेरोजगारांचे एक डबके आहे. विकासाची साधने ज्या प्रमाणात वाढत आहेत त्याच्या कितीतरी पटीने लोकसंख्येचे प्रमाण देखील वाढत आहे. त्यामुळे लोकसंख्येच्या प्रमाणात रोजगार वाढणे हे देखील अशक्य आहे. त्यामुळे वाढत्या लोकसंख्येचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर ताण पडतो. वाढती लोकसंख्या, अकुशल कामगार, दारिद्र्य, करोना संकटामुळे झालेले उलट स्थलांतर व व्यावसायिक शिक्षणाचा अभाव इ. कारणामुळे भारतामध्ये बेरोजगारीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. भारतामध्ये सध्याच्या घडीला अनौपचारिक क्षेत्रामध्ये जवळपास 85 टक्के रोजगार

उपलब्ध आहे तर औपचारिक क्षेत्रामध्ये फक्त 15 टक्के रोजगार उपलब्ध आहे. म्हणून करोनाच्या काळामध्ये लॉकडाउन मुळे व कमी रोजगार यामुळे बेरोजगारीचे प्रमाण वाढले आहे.

व्याख्या:

"प्रचलित वेतन दरावर काम करण्याची इच्छा आणि पात्रता असून देखील रोजगार उपलब्ध होत नाही त्यास बेरोजगारी म्हणतात".

"सर्वसाधारणपणे ज्याला उत्पादकीय प्रक्रियेत कोणताही लाभ मिळत नाही त्याला बेरोजगारी म्हणतात".

येत्या काही दशकात आर्थिक नियोजनामध्ये मनुष्यबळ विकास हा एक सर्वात महत्त्वाचा घटक ठरणार आहे. म्हणून भारतासारख्या देशाला गरज आहे ती शिक्षित व प्रशिक्षित मनुष्यबळाची. गेल्या काही दशकांमध्ये शिक्षण व्यवस्था कौशल्य निर्मिती या दोन्ही क्षेत्रांमध्ये आमूलाग्र बदल घडवून आणणे ही काळाची गरज निर्माण झाली आहे.

भारतासारख्या लोकसंख्येचा मोठा भाग अशिक्षित आणि अकुशल मनुष्यबळाचा असल्यामुळे उद्योगांना पूरक असे शैक्षणिक अभ्यासक्रम मर्यादित स्वरूपात उपलब्ध आहेत. व्यावसायिक व कौशल्य विकासाची कमतरता भारताच्या शिक्षण व्यवस्थेत असल्यामुळे लागणारे कुशल मनुष्यबळ उपलब्ध होत नाही. परिणामी लोकांना बेरोजगार रहावे लागते.

बेरोजगारीचे प्रकार:

हंगामी बेरोजगारी:

भारताची शेती कोरडवाहू स्वरूपाची असल्यामुळे शेती हा हंगामी व्यवसाय आहे. हंगाम नसलेल्या काळामध्ये लोकांना रोजगार मिळत नाही त्याला हंगामी बेरोजगारी असे म्हणतात. शेतीक्षेत्रातील लोकसंख्या जवळपास पाच ते सात महिन्यासाठी बेरोजगार राहतात. अशा शेतीत या कालावधीमध्ये काम मिळत नाही हंगाम संपल्यानंतर बेरोजगार राहावे लागते.

छुपी बेरोजगारी:

ज्यामध्ये गरज नसताना देखील गरजेपेक्षा जास्त श्रमिक काम करताना दिसतात. यामधून काही मजुरांनी काम केले किंवा मजुरांना वाढविले तरी त्याचा परिणाम उत्पादनावर होत नाही. व श्रमिकांची सीमांत उत्पादकता शून्य असते. जमिनीवरचा अधिक भार हा ग्रामीण भागामध्ये छुपी बेरोजगारी निर्माण करतो. जवळपास 20 टक्के इतकी छुपी बेकारी आहे.

सुशिक्षित बेरोजगारी:

श्रमिकांची काम करण्याची इच्छा आणि शैक्षणिक पात्रता असून देखील रोजगार उपलब्ध होत नाही. त्यास सुशिक्षित बेरोजगारी म्हणतात. व्यावसायिक शिक्षणाचा अभाव असल्यामुळे ही बेरोजगारी निर्माण होते.

तांत्रिक बेरोजगारी:

दिवसेंदिवस तंत्रज्ञानामध्ये बदल होत आहेत आणि या तंत्रज्ञानातील बदलामुळे तांत्रिक बेरोजगारी निर्माण होते. आधुनिक तंत्रज्ञान हे भांडवलप्रधान असून यासाठी कमी श्रमिकांची गरज लागते. यातुनच तांत्रिक बेरोजगारी निर्माण होते.

संघर्षजन्य बेरोजगारी:

उद्योगातील संघर्षामुळे संघर्षजन्य बेरोजगारी निर्माण होते. संघर्षजन्य बेकारी ही तात्पुरत्या स्वरूपाची असते. उदा. कामगारांचा संप, यंत्रातील बिघाड, कच्चा मालाचा अभाव.

चक्रीय बेरोजगारी:

अर्थव्यवस्थेतील व्यापार चक्राच्या बदलामुळे निर्माण होणाऱ्या मंदी सदृश्य परिस्थितीमुळे जी बेकारी निर्माण होते, त्या बेरोजगारीस चक्रीय बेरोजगारी म्हणतात. मंदीच्या काळात मागणीमध्ये आणि उत्पन्नात घट होते. त्याचा परिणाम नफा व किंमतीवर होतो. नफा आणि किमतीमध्ये घट झाली असता उत्पादनामध्ये देखील घट केली जाते, परिणामी रोजगारात देखील घट होते आणि श्रमिकांना बेरोजगार रहावे लागते.

बेरोजगारी दर (टक्के)

वर्ष	एकूण	शहरी	ग्रामीण
2019	6.86	8.58	6.05
2020	21.73	23.14	21.11
2021	10.55	11.2	10.3
2022	8.10	7.55	8.35

Source - CMIE

वर्ष 2020 मध्ये बेरोजगारीचा एकूण दर 21. 73 टक्के तर ग्रामीण भागामध्ये 21.11 टक्के व शहरी भागामध्ये 23.14 टक्के इतका होता. इतर वर्षांची तुलना करता या वर्षांमध्ये करोना संकट उद्भवल्यामुळे लॉकडाउन करण्यात आले होते. यामुळे उलट स्थलांतरामध्ये झालेली वाढ, कमी झालेली मागणी, प्राथमिक द्वितीय आणि तृतीय क्षेत्रावर झालेला परिणाम, वाढलेले दारिद्र्याचे प्रमाण यामुळे बेरोजगारीचा दर वाढला होता. वर्ष 2021 सरकारने लादलेले सर्व नियम शिथिल केल्यामुळे औद्योगिक व सेवा क्षेत्र सुरू करण्यात आले होते. त्यामुळे यावर्षी बेरोजगारीचा दर कमी झालेला दिसतो. परंतु वर्ष 2019 मध्ये बेरोजगारीचा एकुण दर 6.86 टक्के तर ग्रामीण भागामध्ये 6.05 टक्के व शहरी भागामध्ये 8.58 टक्के इतका होता आणि वर्ष 2022 मध्ये बेरोजगारीच्या एकूण दरामध्ये 8.10 टक्के इतकी वाढ झाली आहे. तर शहरी भागामध्ये 7.55 टक्के व ग्रामीण भागामध्ये झालेल्या उलट स्थलांतरामुळे 8.35 टक्के इतकी वाढ झाली आहे. थोडक्यात बेरोजगारीमध्ये वाढ होताना दिसून येते. बेरोजगारी मध्ये वाढ झाली असता दारिद्र्यामध्ये वाढ होते आणि दारिद्र्यात वाढ झाली असता बेरोजगारी मध्ये वाढ होते. बेरोजगारी आणि दारिद्र्य यामध्ये सम आणि प्रत्यक्ष संबंध आहेत.

बेरोजगारीची कारणे:

बेरोजगारी ही एक अत्यंत महत्त्वाची ज्वलंत समस्या आहे. दारिद्र्य, व्यावसायिक शिक्षणाचा अभाव, स्थलांतर, शेती क्षेत्रातील अपयश, प्राथमिक औद्योगिक व सेवा क्षेत्राचा अल्प विकास, अकुशल कामगार, दरडोई उत्पन्न कमी, अल्प उत्पन्न, जमिनीचा अभाव, निरक्षरता, आरोग्य सुविधेचा अभाव इ.मुळे बेरोजगारी निर्माण होते.

दारिद्र्य आणि बेरोजगारी कमी करण्यासाठी उपाययोजनात्मक शिफारस:

- वाढती लोकसंख्या नियंत्रित करण्यासाठी कुटुंब नियोजनाचा प्रसार आणि प्रचार करणे आणि लोकांना साक्षर बनविणे.
- अकुशल मजुरांना व्यावसायिक प्रशिक्षण देणे व भारतामध्ये व्यावसायिक प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांची निर्मिती करणे आणि प्रशिक्षण देणे.

- दारिद्र्य आणि बेरोजगारी या समस्यांचे निर्मूलन करण्यासाठी शासनाने केलेल्या उपाययोजनाMची योग्य ती अंमलबजावणी करणे. उदा.मनरेगा
- शेती,, औद्योगिक व सेवा क्षेत्रामध्ये सुधारणा घडवून आणणे.
- अकुशल आणि कुशल श्रमिकांना राष्ट्रीय उत्पादनामध्ये अधिकाधिक सामावून घेणे.
- भांडवल, तंत्रज्ञान आणि पायाभूत सुविधांचा विकास करणे आणि गुंतवणुकीचे प्रमाण वाढविणे.
- आर्थिक विषमता कमी करणे.

सारांश:

दारिद्र्य आणि बेरोजगारी या आजच्या भारतापुढील अत्यंत महत्त्वाच्या आव्हानात्मक आणि ज्वलंत समस्या बनलेल्या आहेत. या दोन्ही समस्यांचे स्वरूप अस्पष्टच आहे. देशामध्ये औपचारिक क्षेत्रामध्ये 15 टक्के तर अनौपचारीक क्षेत्रामध्ये 85 टक्के रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत. परंतू अनौपचारिक क्षेत्रामध्ये अल्प उत्पन्न मिळत असल्यामुळे मूलभूत गरजा पूर्ण होत नाहीत व काही श्रमिक काम करण्यास नकार देतात. भारतामध्ये साधन संपत्तीचे असमान, वितरण, लोकसंख्यावाढ, अकुशल कामगार, व्यावसायिक प्रशिक्षणाचा अभाव, दरडोई उत्पन्न कमी, पायाभूत सुविधांचा अभाव, व्यापार चक्रातील चढ-उतार, आर्थिक धोरणातील धरसोडपणा, निरक्षरता, औपचारिक क्षेत्रातील कमी झालेल्या रोजगाराच्या संधी, प्रश्न सोडविण्यासाठी आवश्यक असलेल्या राजकीय इच्छाशक्तीचा अभाव, विकास कार्यक्रमांच्या कार्यवाहीची अंमलबजावणी व्यवस्थित न करणे, आरोग्य सुविधांचा अभाव, जमिनीचा अभाव या सामाजिक समस्या सुटण्याऐवजी अधिकाधिक गुंतागुंतीच्या व तीव्र समस्या बनत आहेत. वर्ष 2019 मध्ये बेरोजगारीचा दर 6.86 टक्के इतका आहे. परंतू वर्ष 2022 मध्ये बेरोजगारीच्या दरामध्ये 8.10 टक्के इतकी वाढ झालेली दिसून येते. वर्ष 2020 ते 2021 मध्ये दारिद्र्याचा दर 27.9 टक्के इतका असून वर्ष 2011 ते 2012 मधील 21.9 टक्के दराच्या तुलनेत जास्त आहे. दारिद्र्यामुळे बेरोजगारी आणि बेरोजगारीमुळे दारिद्र्य वाढत आहे. या सामाजिक समस्यांचे प्रमाण देखील वाढत आहे. एकूणच या दोन्ही समस्या देशाच्या आर्थिक विकासातील अडथळा ठरत आहेत.

REFERENCE:

1. Sachhitanand Agale & Liladhar Atram, "Economics" Maharashtra state bureau of textbook production & curriculum research Pune, First Edition 2019.
2. Akhatar Gul, "Covid 19 impact on poverty and unemployment levels: A case Pakistan" JRRSS Pakistan, Vol 3(2), Dec. 2020
3. Daljeet Singh "Report on Employment - Unemployment scenario among different sociology groups" Government of India, 2013 – 14
4. Raj Krishna & Sanchit Kumar, "Unemployment & Poverty paradox in India " EPW, Nov 1983
5. Raj Krishna, "Unemployment in India " www.jstor.org, 1973
6. CMIE Report 2019, 2020, 2021 & 2022.
7. Ministry of labour and Employment (Government of India) Annual Report 2020 - 21.